REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
सालीठ पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख २७ डिसेंबर, १९४४ अंक ५१




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

## देना विमा कंपनी

मध्यें
तुमचा विमा उतरवा
जिंदगी ★ आग ★ मोटर

सुरेश के. देसाई, मॅनेजर.
हिंमतलाल गांधी, मॅ. डायरेक्टर.

देवकरण नानजी बिल्डिंग्ज, एल्फिन्स्टन सर्कल, कोट, मुंबई.

## गुरांचा खुराक

हा खुराक सर्व-गाय, म्हैस, घोडा, शेळी—जनावरांना, कोंबडीं, बदकें इत्यादि प्राण्यांना व इतर पाळीव पक्ष्यांना उपकारक ठरला आहे.

हा खुराक नित्य दिल्यानें पुढील गुण अनुभवास येतात:—

(१) जनावरांची हाडें मजबूत होऊन रक्तशुद्धि होते व तें शरीरांत चांगल्या तऱ्हेनें खेळूं लागतें.

(२) प्राण्यांना जखम झाली असतां ती लौकर भरून येण्याची प्रवृत्ति रक्तांत उत्पन्न होते.

(३) प्राण्यांची पचनक्रिया सुधारते व त्यांना तरतरी येते.

(४) दूध देणाऱ्या जनावरांचा गर्भाशय दृढ होऊन गर्भधारण व गर्भपोषण चांगलें होतें.

(५) दुभत्या जनावरांचें दूध वाढतें.

(६) कोंबड्या व बदकें हीं मोठीं अंडीं घालूं लागतात व त्या अंड्यांची कवचीहि बळकट होते.

आय. ए. सी. आर. लि.
कर्वे रोड, पुणें ४

## सांडू टोमॅटो कम्पाउन्ड

(ए. बी. डी. व्हिटॅमिनयुक्त)

ओरिजिनल
ब्राम्ही तेलाचे
कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स. चेंबूर, लिमिटेड.
चेंबूर. मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कॅंप टाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

# विविध माहिती

**आसामसाठी संयुक्त प्रांतीय मजुरांची रवानगी**

आसाममधील "अधिक धान्य पिकवा" मोहिमेस जोर आणण्यासाठी संयुक्त प्रांतांतील १०,००० मजुरांना तेथें पाठविण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे, असें समजतें.

**पोलिश प्रश्नाबाबत इंग्लंडचें धोरण**

पोलंडच्या पूर्वेचा भाग रशिया व्यापणार आहे. ह्यामुळें पोलंडचें जें नुकसान होईल, तें भरून काढण्यासाठी त्यास जर्मनीचा कांहीं भाग तोडून द्यावा, अशी इंग्लंडची योजना आहे. ही योजना प्रत्यक्ष अंमलांत आणल्यास, पूर्वेकडील १,०७,००,००० पोल लोकांना आपलीं घरेंदारें सोडून दुसरीकडे जावें लागेल. जर्मनांनाहि आपला प्रदेश सोडतेवेळीं सर्वस्वाचा त्याग करून दुसरीकडे निवाऱ्यासाठी आश्रय घ्यावा लागेल.

**दारिद्र्य व राजकीय पारतंत्र्य ह्यांचा काय संबंध !**

"दारिद्र्य नाहींसें करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी राजकीय स्वातंत्र्याच्या मागें लागणें हें फाजील व पोकळ अभिमानाचें लक्षण आहे."—पंजाब प्रांताचे अर्थमंत्री, सर मनोहरलाल.

**जळगांव येथील प्रदर्शन**

डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, रावबहादुर रेगे, ह्यांनीं जळगांव येथील शेती व जनावरें ह्यांच्या प्रदर्शनाचें उद्घाटन केलें. कपास व भुइमूग ह्यांच्या सर्वोत्कृष्ट नमुन्यास प्रत्येकीं १०० रुपयांचीं बक्षिसें देण्यांत आलीं.

**पुलगांव कॉटन मिल्स**

वरील कंपनीस ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी ९ लक्ष, ४० हजार रुपये नफा झाला.

**हिंदी कस्टम्सचें वाढतें उत्पन्न**

| | रुपये |
|---|---|
| नोव्हेंबर, १९४३ | ४,१९,००,००० |
| ऑक्टोबर, १९४४ | ८,६२,००,००० |
| नोव्हेंबर, १९४४ | ९,२३,००,००० |

**खेडेगांवांतील पुस्तकालयें.**

मुंबई सरकारच्या प्रौढ शिक्षण योजनेप्रमाणें खेडेगांवांत स्थापन करण्यांत आलेल्या पुस्तकालयांची यादी ता. २३ च्या सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झाली आहे. ३१ मार्च १९४४ रोजीं अशा पुस्तकालयांची संख्या १,५६५ होती. त्यांपैकी २५९ उत्तर भागांत, ४६९ मध्य भागांत व ८३७ दक्षिण भागांत होती. त्यांची भाषावार वांटणी कानडी ६६५, मराठी ६१३, गुजराती २१६ व उर्दू ३६ अशी करतां येईल. १५ पुस्तकालयांत एकापेक्षां अधिक भाषांतील पुस्तकें होतीं.

**हिंदी रेल्वेजचें उत्पन्न**

| १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर | रुपये |
|---|---|
| १९४३ | १,१५,८६,००,००० |
| १९४४ | १,३६,६१,००,००० |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ✣ | ✣ | ✣ | ✣ | नोव्हेंबर | ✣ | ✣ | सन | | | | |
| जुलै | आक्टोबर | ✣ | ✣ | मार्च | ✣ | डिसेंबर | | | | | |
| एप्रिल | जानेवारी | मे | ऑगस्ट | फेब्रुवारी | जून | सप्टेंबर | १९४५ | | | | |
| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | १ | ८ | १५ | २२ | २९ |
| सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | २ | ९ | १६ | २३ | ३० |
| मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | ३ | १० | १७ | २४ | ३१ |
| बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | ४ | ११ | १८ | २५ | ✣ |
| गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | ५ | १२ | १९ | २६ | ✣ |
| शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | ६ | १३ | २० | २७ | ✣ |
| शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | ७ | १४ | २१ | २८ | ✣ |

(हें कॅलेंडर गतवर्षाप्रमाणें श्री. जी. टी. सोनार, क्लार्क, नंदुरबार को. मु. युनियन ह्यांनीं तयार करून लोकांच्या कागदाची बचत व्हावी ह्या हेतूनें 'अर्था' मध्यें प्रसिद्धीसाठी पाठविलें आहे.)

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४२२ |
| २ बँकांवर युद्धपरिस्थितीचे परिणाम ... ... | ४२३ |
| ३ विवाहापेक्षा घटस्फोट ज्यास्त ! ... ... | ४२४ |
| ४ कपाशीची लागवड... | ४२४ |
| ५ स्फुट विचार... ... ग्रेटब्रिटनचें परराष्ट्रीय देणें—उसाची लागवड—"कोठार तज्ज्ञ"—सहकारी मालवाटणी | ४२५ |
| ६ बिहार प्रांताची सहकारी परिषद् ... ... | ४२७ |
| ७ सहकारी स्टोअर्संना कर्ज | ४२७ |
| ८ शुगर केन कमिटी ... | ४२७ |
| ९ सहकारी इन्स्टिट्यूटचा वार्षिक अहवाल ... | ४२८ |
| १० रॉकडेल पायोनिअर्स | ४२९ |
| ११ शेतकऱ्याचें दारिद्र्य | ४३० |
| १२ धान्य व अन्न प्रश्न | ४३१ |

# अर्थ

बुधवार, ता. २७ डिसेंबर, १९४४

## बँकांवर युद्धपरिस्थितीचे परिणाम

जगाच्या मोठ्या भागावर पसरलेल्या प्रस्तुत युद्धाच्या योगानें राष्ट्रीय आर्थिक जीवनाच्या ओघांत सर्वत्र बदल होऊन त्यास निराळी दिशा लागली आहे. लढाऊ सामुग्रीची बनावट आणि तिची वहातुक ह्यांवर राष्ट्रांची शक्ती युद्धांत एकवटावी लागते, बिन-लढाऊ उपयोगाचा माल दुर्मिळ होऊन त्याच्या किंमती चढतात, युद्धखर्च भागवण्यासाठी राष्ट्रीय सरकारांस करवाढ मोठ्या प्रमाणावर करावी लागते आणि कर्जाच्या आश्रयानें जरूर त्या प्रचंड रकमा उभाराव्या लागतात, जनतेस नित्याच्या चरितार्थास लागणाऱ्या वस्तूंच्या पुरवठ्याचें व किंमतीचें नियंत्रण करणें अपरिहार्य होतें व चलनाचा विस्तार आवश्यक होऊन महागाईस त्याची मदत होते. अशां रीतीनें उद्योगधंदे, व्यापार, व्यवसाय ह्या सर्वांचें मामुली स्वरूप व त्यांचा ओघ बदलला असतां बँकिंगच्या व्यवहारांत बदल होणें क्रमप्राप्तच आहे. लोकांच्या हातांत अधिक चलन खेळतें आणि त्याचा ओघ ठेवींच्या मार्गानें बँकांकडे वळतो आणि उद्योगधंदे व व्यापार ह्यांसाठी त्यांचा विनियोग ह्या संस्थांस करतां न आल्यानें त्यांतला पुष्कळसा पैसा सरकारी कर्जरोख्यांत गुंतवण्यावांचून गत्यंतर रहात नाहीं. जनतेची बचत स्वतःपाशीं ठेव म्हणून ठेवून घेणें आणि तिच्यापैकी कांहीं रकम रोकड व तरती राखून बाकीच्या पैशाचीं व्यापार-उदीमाच्या सोयीसाठी कर्जें गरजू लोकांस देणें हा बँकांचा मुख्य व्यवहार होय. पण वर वर्णिलेल्या युद्ध-परिस्थितींत बँकांतील वाढलेल्या ठेवींचा पैसा पूर्वीच्या मानानें अधिक मोकळा व तरता रहातो आणि त्यांतला केवळ अल्प अंश व्यापाऱ्यांस कर्जें देण्यांत वापरला जातो. मुख्यत्वेंकरून सरकारी रोख्यांत जनतेच्या बचतीचा पैसा गुंतवण्याचें कार्य बँकांकडे येतें आणि कमी व्याजानें पण मोठ्या प्रमाणांत रकमा अशा रीतीनें गुंतवल्यामुळेंच त्यांचा नफा न घटतां स्थिर राहूं शकतो.

गेल्या पांच वर्षांत बँकांच्या येण्याच्या बाबींची वाटणी कशी बदलत गेली आहे आणि ही प्रवृत्ति ब्रिटिश बँकांत, हिंदुस्थानांतील जॉइंट स्टॉक बँकांत आणि सहकारी बँकांत कोणत्या दिशेनें होत आहे ह्याची तुलनात्मक कल्पना मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांच्या चालकांस यावी, ह्या हेतूनें प्रो. काळे ह्यांनीं जरूर ते आकडे गोळा करून त्यांची बोधप्रद मांडणी एका चोपड्यांत केली आहे आणि तें बॉंबे को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें प्रसिद्ध केलें आहे. (Recent Trends in Co-operative Banking in Bombay Province : 1– Provincial Bank and Central Banks ) प्रो. काळे ह्यांनीं प्रथम ब्रिटिश बँकांचे संबंधांतले आकडे दिले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं युद्धाच्या पहिल्या पांच वर्षांत त्या बँकांतील ठेवी २१९ कोटि पौंडांवरून ४११ कोटि पौंडांवर गेल्या आणि अशा रीतीनें त्यांमध्यें ८८ टक्के वाढ झाली. पण ह्या वाढलेल्या ठेवींचा विनियोग ब्रिटिश बँकांनीं कसा केला ! १९३९ सालीं रोख्यांतील गुंतवणीचें ठेवींशीं प्रमाण २७·७ टक्के होतें तें १९४४ मध्यें ५९ टक्क्यांवर चढलें आणि कर्जाचें प्रमाण ४५·५ टक्क्यांवरून १८·८ टक्क्यांपर्यंत घसरलें. हिंदुस्थानांतील शेड्यूल्ड बँकांचा विचार करतां त्यांची संख्या अलीकडे वाढली आहे हें ध्यानांत बाळगलें पाहिजे. त्यांतल्या ठेवी २३६ कोटि रुपयांच्या ८११ कोटि रुपये झाल्या, म्हणजे २४३ टक्क्यांनीं वाढल्या, परंतु त्यांनीं दिलेली कर्जें १०५ कोटि रुपयांचीं २१० कोटि झालीं म्हणजे केवळ १०० टक्के अधिक झालीं. ह्या शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाचें त्यांच्या ठेवींशीं प्रमाण १९३९ मध्यें ४५ टक्के होतें, तें १९४४ मध्यें २७ टक्क्यांपर्यंत खालीं आलें. इंपीरिअल बँकेच्या रोख्यांतील गुंतवणुकीचें प्रमाण ६० टक्के १९३९ मध्यें होतें, तें पांच वर्षांनीं तसेंच स्थिर राहिलें, पण दिलेल्या कर्जाचें प्रमाण ३४ टक्क्यांवरून २४ टक्क्यांवर उतरलें. हिंदी जॉइंट स्टॉक बँकांच्या व्यवहारांतील फेरबदलाची प्रवृत्ति ब्रिटिश बँकांच्या वळणावरच आहे हें वरील तुलनात्मक आकड्यांवरून दिसून येईल.

मुंबई प्रांतांतील सहकारी मध्यवर्ती बँकांकडे वळलें असतां हाच प्रकार स्पष्ट आढळतो. प्रांतिक सहकारी बँक व सेंट्रल बँका ह्यांच्या ठेवींची रकम पांच वर्षांत ४०२ लक्षांची ७९५ लक्ष रुपये झाली, म्हणजे दुप्पट झाली. नुसती प्रांतिक बँक घेतल्यास ही वाढ १२७ टक्के झाली आणि सेंट्रल बँका स्वतंत्र एकत्र घेतल्या तर वाढीचें प्रमाण ७३ टक्के होतें. ह्या सर्व बँकांचीं कर्जें मात्र २३४ लक्षांचीं ३२० लक्ष रुपये झालीं, म्हणजे त्यांत फक्त ३६ टक्क्यांची वाढ झाली. नुसत्या सेंट्रल बँका हिशेबांत घेतल्या असतां कर्जाची वाढ फक्त २ टक्के झाल्याचें दिसतें. प्रांतिक बँकेंतील वाढ मात्र ८५ टक्के झालेली आहे. ठेवी वाढल्या आणि त्यांच्या प्रमाणांत बँकांनीं दिलेलीं कर्जें वाढलीं नाहींत, ह्याचें कारण शेतीच्या मालास चांगला भाव आल्यानें प्राथमिक पतपेढ्यांच्या सभासदांनीं आपलीं थकलेलीं कर्जें फेडलीं आणि नवीन कर्जें लहान प्रमाणावर घेतलीं हें आहे. ह्याचा परिणाम बँकांची कर्जरोख्यांतील गुंतवण वाढण्यांत होणें स्वाभाविक आहे. प्रांतिक बँकेची गुंतवण १५२ टक्क्यांनीं वाढली, सेंट्रल बँकांच्या गुंतवणुकींत १७० टक्क्यांची वाढ झाली आणि दोहोंच्या वाढीचा आकडा १६४ टक्के झाला. रोकड, इतर बँकांत ठेवलेली शिल्लक व रोख्यांतील गुंतवण ह्यांची एकूण रकम मिळून बँकांचा तरता पैसा होतो. त्याचें प्रमाण बहुतेक सेंट्रल बँकांत विलक्षण वाढलें आहे आणि कांहीं बँकांत तें शंभराचेवर किंवा जवळ असें आहे. युद्ध समाप्तीनंतर ठेवी कमी होतील तेव्हां बँकांचे व्यवहारास कोणतें वळण असणें शक्य व इष्ट आहे ह्याचा विचार होऊन ह्या संस्थांनीं एव्हां-

धमून आपलें धोरण व्यवस्थित रीतीनें आखावें अशी प्रो. काळे ह्यांची सूचना आहे. मालाच्या तारणावर कर्जें देण्याची व्यवस्था सेंट्रल बँकांस करावी लागेल आणि शेतकरीकर्जनिवारणाच्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळें ह्या व्यवहारांत विस्तार होईल. त्यावेळीं बँकांस पैशाची टंचाई भासण्याचा संभव आहे आणि चालू खर्च व व्याजाची प्राप्ती ह्यांचा योग्य मेळ घालावा लागेल. प्रो. काळे ह्यांनीं दिलेले तुलनात्मक आकडे बोधप्रद असून बँकांच्या व्यवहाराच्या दृष्टीनें सूचक आहेत. जॉइंट स्टॉक आणि सहकारी बँकांनीं स्वतःचें धोरण सुरक्षित रीतीनें आखण्याकडे त्यांचा उपयोग करावा अशी अपेक्षा आहे.

## विवाहांपेक्षा घटस्फोट जास्त ?

१९४० सालीं अमेरिकेंतील प्रत्येक ५ किंवा ६ विवाहांपैकी एकाचा शेवट घटस्फोटांत झाला. चालू वर्षी, ४ किंवा ५ विवाहांत एक घटस्फोट असें तेथें प्रमाण पडेल. युद्धपरिस्थितीमुळें सध्या विवाहांस चालना मिळाली आहे, त्याची गति कमी होतांच घटस्फोटांचें प्रमाण वाढत जाईल. आघाडीवर निघणारा सैनिक तातडीनें विवाह करून जातो, तो परत आल्यावर त्यास आपली पत्नी कल्पनेइतकी आकर्षक वाटणार नाहीं व लष्करी वेषांत दिसणारा वीर साध्या वेषांत पुढें पत्नीला बावळट वाटूं लागेल. युद्ध संपल्यावर अमेरिकेंत घटस्फोटांचें पेव फुटेल! विवाह टिकविण्याचा पती व पत्नी ह्यांनीं आतांपासूनच कसून प्रयत्न केला, तरच ही आपत्ति कमी होईल. गेल्या वर्षी कॅलिफोर्नियामध्यें लॉस एंजल्स कौंटींत ३३,००० विवाह झाले आणि घटस्फोटांची संख्या २४,००० भरली. म्हणजे १० विवाह झाले तर घटस्फोट होऊन ८ मोडले! १९४५ सालीं विवाहांपेक्षा घटस्फोटांचीच संख्या तेथें अधिक भरेल, अशीं चिन्हें दिसत आहेत. विवाहाची घाई करण्यांत मुख्यतः मुलींचाच दोष असतो, ही गोष्ट विसरतां कामा नये. आघाडीवर निघालेला व परत येणारा सैनिक ह्यांच्या मनःस्थितीमधील फरक नीट अभ्यासून त्यास घरीं आल्यावर त्याच्या अपेक्षेच्या शक्य तेवढ्या मोठ्या प्रमाणांत सुख मिळावें, असा प्रयत्न मागें राहिलेल्या पत्नींनें करावा, असा त्यांस उपदेश करण्यांत येत आहे. युद्धजन्य परिस्थितीचा समाजावर कसा परिणाम होतो, ह्याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

### ओरिसाची नवी राजधानी—"भुवनेश्वरी"

ओरिसा प्रांताच्या सरकारनें भुवनेश्वर हें शहर आपली नवी राजधानी म्हणून नियुक्त करावें अशी प्रांतिक असेंब्लीची शिफारस आहे. भुवनेश्वर कटकच्या (सध्याची राजधानी) दक्षिणेस १६ मैलांवर आहे. हें फार प्राचीन गांव आहे. त्याचें आम्रतीर्थ असेंहि नांव आहे. ५ ते १२ शतकेंपर्यंत केसरी घराण्यांतील राजे येथें राज्य करीत होते. काशीच्या तोडीचें हें शहर करण्याचा त्यांचा बेत होता. शहराजवळील भुवनेश्वर तलावाभोंवतीं २०० देवळें आहेत. मुख्य भुवनेश्वर महादेवाचें देऊळ फार उंच होतें व त्याभोंवतीं ७ हजार मूर्ती त्या वेळीं होत्या.

### न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेच्या डायरेक्टरांनीं क्यु. प्रे. व ऑर्डिनरी शेअर्सवर ५% व डिफर्ड शेअर्सवर ६% इंटेरिम डिव्हिडंड ३० सप्टेंबर अखेरच्या पहिल्या सहामाहीकरितां जाहीर केलें आहे. बँकेच्या शेअर्सची विक्री ३ जानेवारी रोजीं निश्चित बंद होणार आहे. प्रेफरन्स शेअर्स सर्व खपले आहेत.

## कपाशीची लागवड कमी करण्याची सक्ती

### तपशीलवार योजना

हिंदुस्थानांतील कपाशीची लागवड ह्यापुढें कडक रीतीनें मर्यादित केली जाणार आहे. पांच वर्षांची योजना प्रथम अंमलांत येईल. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या जानेवारी अखेरच्या बैठकींत ह्या योजनेचा तपशीलवार विचार होईल व हिंदुस्थान सरकार योग्य तो कायदा तयार करून त्यास मध्यवर्ती विधिमंडळाची मान्यता मिळवील.

धान्याचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता, हिंदी कपाशीस परराष्ट्रीय बाजारपेठेंत मिळणारा वाव, कपाशीस येत्या पांच वर्षांतील अपेक्षित मागणी व सध्या पडून असलेला कांहीं प्रकारच्या कपाशीचा मोठा साठा, हीं सर्व लक्षांत घेऊनच योजना आखण्यांत येईल. १९४२–४३ मध्यें हिंदी कपाशीचें क्षेत्र, १,९२,००,००० एकर होतें, त्यांत १९४५–४६ सालीं व १९४६–४७ सालीं ३१,००,००० एकरांची घट व्हावी, असा उद्देश आहे. त्यानंतर तात्कालिक परिस्थिति लक्षांत घेऊन किती कपास लावली जावी, हें ठरविण्यांत येईल. मुख्यतः आखूड व मध्यम लांबीच्या धाग्याच्या कपाशीचे क्षेत्रांतच घट करविली जाईल.

ज्या प्रकारच्या कपाशीचें क्षेत्र मर्यादित केलें जाणार नाहीं, त्या प्रकारच्या कपाशीचे क्षेत्रांत वाढहि करण्यांत येतां कामा नये. काळ्याचें पाणी आखूड धाग्याच्या कपाशीस मिळणार नाहीं. कपाशीच्या लागवडींतील घट सक्तीनें घडवून आणली जाईल. ज्या प्रांतांत व संस्थानांत कपाशीचें क्षेत्र अशा प्रकारें कमी होईल, त्यांना जनावरांसाठी लागणारी पेंड बाहेरून आयात करतां येईल. कपाशीची भेसळ करण्यास मध्यवर्ती सरकारच्या कायद्यानें बंदी केली जाईल.

## वाडा पेटा सहकारी खरेदी-विक्री युनियन, लि.

### डायरेक्टर ऑफ सिव्हिल सप्लाइजची भेट

३०-६-४४ अखेर संपलेल्या वर्षी युनियननें एकूण २,६४,१८३ रुपयांची खरेदी करून २,४२,७७२ रुपयांची विक्री केली. वर्षअखेर शिलकी माल ५०,१२० रुपयांचा होता. ठोक नफा १४,५३१ रुपये व निव्वळ नफा ४,४७८ रुपये झाला. वाडा येथें युनियनचीं चार दुकानें आहेत व पेठ्यांत एकूण नऊ केंद्रें आहेत. नियंत्रित मालाप्रमाणें अनियंत्रित मालाचाहि व्यवहार चालू आहे, त्यामुळें भरमसाट भावास आळा बसला आहे. नोकरांच्या बदल्या तालुक्यांतील सर्व दुकानांवर केल्या जातात. पेठ्यांतील लोकांनीं सुमारें ५६ हजारांच्या ठेवी युनियनकडे ठेवल्या आहेत. डायरेक्टर ऑफ सिव्हिल सप्लाईज, मि. बूथ, ह्यांनीं युनियनला ता. १३ डिसेंबर रोजीं भेट दिली, त्यावेळीं त्यांनीं खालील शेरा लिहून ठेवला:—

"ह्या युनियनला भेट देऊन, पेठ्यांत जीवनोपयोगी मालाच्या वाटणीच्या कामाची माहिती समजून घेण्याची मला संधी मिळाली, ह्याबद्दल आनंद होतो. सध्याच्या परिस्थितींत हें काम फारच महत्त्वाचें आहे आणि सहकारी मार्केटिंग व पुरवठा संघटनेचा तो कणा म्हणून उपयोगी पडेल. श्री. देशमुख ह्यांस सहकारी खात्यानें युनियनकडे मॅनेजरचें काम करण्यासाठी पाठविलें आहे. त्यांची मुदत आणखी एक वर्ष तरी वाढविणें त्या खात्यास शक्य होईल, अशी मला आशा आहे."

# स्फुट विचार

## ग्रेट ब्रिटनचें परराष्ट्रीय देणें

ग्रेट ब्रिटननें आपलें युद्धकालीन देणें भागविण्यासाठी परराष्ट्रांतील सरकारी रोखे विकले असले, तरी तेथील औद्योगिक मंडळ्यांचे भाग मात्र आपल्या तिजोरींतून फारसे बाहेर काढलेले नाहींत. उदाहरणार्थ, आपले हिंदुस्थान सरकारचे रोखे व हिंदी रेल्वेजमधील हितसंबंध हे ब्रिटिश सरकारनें मोडून कांहीं अंशीं देणें भागविलें, परंतु ताग, कोळसा, चहा, पेट्रोल, इत्यादींच्या कंपन्यांचे शेअर्स ब्रिटिशांनीं सोडलेले नाहींत. सरकारी व निमसरकारी रोख्यांवर व्याजाचा दर अत्यल्प असतो व कंपन्यांच्या शेअरवर डिव्हिडंड चांगलें सुटतें. ब्रिटिश सरकारकडून मिळावयाच्या हिंदुस्थान सरकारच्या रकमा ग्रेट ब्रिटनमध्यें पडून आहेत, त्यांवर व्याजाचा दर अत्यल्प मिळतो. म्हणजे, ब्रिटिश राष्ट्राच्या हिंदुस्थानांत गुंतलेल्या रकमेवरील डिव्हिडंडमधून तें हिंदुस्थानास द्यावयाचें व्याज सहज भागवूं शकतें, इतकेंच नव्हे तर त्या हिशेबांत त्यास नफा उरतो. हिंदुस्थान सरकारच्या येण्याची रकम फारच मोठी असल्याकारणानें त्यावरील व्याजाबद्दल हुज्जत घालत बसण्यांत आज कांहींच फायदा नाहीं. तथापि, परराष्ट्रांचें देणें भागवितांना ग्रेट ब्रिटननें घेतलेली सावधगिरी लक्षांत यावी व त्याचा हिंदुस्थानवर होणारा परिणाम नजरेंतून जाऊं नये, एतदर्थ्यासाठी ब्रिटिश धोरणाची माहिती वर थोडक्यांत दिली आहे.

---

## उसाची लागवड कमी करणें चुकीचें !

चालू वर्षीं निरनिराळ्या प्रांतांस मिळावयाच्या साखरेंत घट होणार आहे व १९४४–४५ मधील उसाचें उत्पादन कमी होणार आहे, ह्या दोन घटनांसंबंधी आपले विचार श्री. एम्. पी. गांधी ह्यांनीं एक पत्रक काढून व्यक्त केले आहेत. वाढती लष्करी मागणी, आजूबाजूच्या देशांची मागणी व स्थानिक मागणी भागविण्यासाठी साखरेचें उत्पादन वाढविण्याकरितां १९४३ सालीं जोरानें प्रचार सुरू झाला व त्यामुळें साखरेचें उत्पादन १५% वाढलें. तथापि, संयुक्त प्रांत व बिहार येथें शेतकऱ्यांस उसाची ठरवून दिलेली किंमत धान्याच्या बाजारभावाचे मानानें फार कमी असल्याकारणानें उसाची लागवडहि कमी झाली. मुंबई प्रांतांत उसाच्या क्षेत्रांत ठराविक प्रमाणांत धान्य पेरण्याची सक्ती करण्यांत येत असल्याकारणानें, ह्या प्रांतांतहि साखरेचें उत्पादन पुष्कळच कमी होईल. अशा रीतीनें, साखरेचें हिंदी उत्पादन लष्करी मागणी व निर्गत हीं खूपच कमी झाल्याविना, लोकांच्या गरजा भागविण्यास समर्थ होणार नाहीं. मुंबई प्रांतांतील साखरेचें उत्पादन प्रांताच्या गरजेच्या निम्म्या इतकें सुद्धा नाहीं आणि इतर ठिकाणच्या पेक्षा मुंबई प्रांतांतील उत्पादन अधिक किफायतशीर आहे, ह्या गोष्टी लक्षांत घेऊन मुंबई सरकारनें साखर-कारखान्यांवर उसाची जागा धान्याच्या पिकांस देण्याची सक्ती करूं नये, असें श्री. गांधी ह्यांचें म्हणणें आहे.

---

## " कोठार-तज्ज्ञां " साठी शिक्षणक्रम

धान्य साठविण्याच्या पद्धतशीर योजनेचे अभावीं हिंदुस्थानांत दरसाल सुमारें ३३३ लक्ष टन धान्य नाश पावतें, असा अंदाज आहे. मणास सरासरीनें १० रुपये, ह्या ठोकळ हिशेबानें, त्याची वार्षिक किंमत ९० कोटि रुपयांवर जाते. ह्या धान्यावर ७० लक्ष लोकांचें पोट भरूं शकलें असतें ! एकट्या गव्हाचेंच उदाहरण घेतलें, तर वार्षिक १ कोटि टनांच्या उत्पादनापैकी ३ लक्ष टनांचा नाश होतो. सध्याच्या धान्यटंचाईचे काळांत असा नाश अक्षम्यच ठरेल. हिंदुस्थानांत सरकारनें आतां कांहीं महत्त्वाच्या केंद्रांत धान्याचीं कोठारें बांधण्याचें ठरविलें आहे. पंजाबांतील कोठारांतून ८०,००० टन, सिंध व मध्यप्रांत ह्यांतील कोठारांतून प्रत्येकीं २५,००० टन, आसाम व ओरिसा ह्यांत प्रत्येकीं १०,००० टन, व पूर्वविभागांतील संस्थानांत २५,००० टन इतक्या धान्याच्या साठ्याची सोय करण्यांत यावयाची आहे. कोठारांसाठी लागणारा भांडवली खर्च मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें ह्यांत निम्मा निम्मा वाटला जाईल. कांहीं महत्त्वाच्या बंदरांत मध्यवर्ती सरकार कोठारें बांधणार आहे, तीं वेगळींच. कोठारांत धान्य टाकण्यापूर्वी तें नीट तपासण्याची आजवर व्यवस्था नव्हती, ती करण्यांत येणार आहे. साठा करण्याचें आणि किडीचा उपद्रव थांबविण्याचें शिक्षण देण्यासाठी हिंदुस्थान सरकार खास शिक्षणवर्ग चालविणार आहे, असें समजतें.

---

## मुंबई प्रांतांतील सहकारी मालवाटणी

हिंदुस्थानांत आणि विशेषतः, मुंबई प्रांतांत मालाची खरेदी-विक्री सहकारी पद्धतीनें करण्याची प्रथा विशेष विस्तार पावलेली नाहीं. तथापि, युद्धपरिस्थितीमुळें नित्याच्या जरूरीच्या जिनसा मिळणें दुष्कर झालें, त्यांच्या किंमती कडाडल्या आणि त्यांची वाटणी रेशनिंगच्या पद्धतीनें करणें अपरिहार्य झालें. अशा स्थितींत सामुदायिक रीतीनें मालाची खरेदी-विक्री केली जाण्याची आवश्यकता लोकांस भासली आणि त्यासाठी सहकारी संघटनाचा आश्रय करण्याचें महत्त्व त्यांस पटूं लागलें. ह्या कामीं सरकारनेंहि सहकारी संस्थांस उत्तेजन देण्याचें ठरवलें आणि नियंत्रित केलेल्या मालाची वाटणी त्यांचेमार्फत वाढत्या प्रमाणावर होऊं लागली. सहकारी पद्धतीच्या मालवाटणीची प्रगति मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या जिल्ह्यांत कशी चालली आहे ह्याचें निरीक्षण करून ह्या कामीं कोणत्या अडचणी येत आहेत ह्याची माहिती काढणें आणि त्यांत सुधारणा सुचवणें ही कामगिरी श्री. नगरशेट ह्यांनीं उत्तम रीतीनें बजावली असून त्यांच्या श्रमाचें फळ एका इंग्रजी पुस्तिकेच्या स्वरूपांत मुंबई प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटनें अनतेच उपलब्ध करून दिलें आहे. ( Co-operative Distribution in Bombay " by M. P. Nagarsheth, B. Com., Bombay Provincial Co-operative Institute, Price Rs. 2-8-0 ) सहकारी खरेदी-विक्रीच्या संघटनेचा व कार्याचा प्रथम इतिहास देऊन त्यासंबंधांतली आजची स्थिति काय आहे हें त्यांनीं आकड्यांनिशी दाखवलें आहे. निरनिराळ्या जिल्ह्यांत प्रगति कशी व किती झाली आहे हें त्यांनीं दिलेल्या माहितीवरून समजतें. प्रगति व सुधारणा ह्यांचे बाबतींत त्यांनीं केलेल्या सूचना उपयुक्त आहेत. श्री. नगरशेट ह्यांची पुस्तिका मार्गदर्शक होण्यासारखी आहे.

---

## हिंदुस्थानचे नवे फडनवीस

सर जेरेमी रेस्मन ह्यांचे जागीं सर आर्चिबाल्ड रोलंड्स ह्यांची फडनवीस म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या हिंदीकरणाचे धोरणास अनुसरून, फडनविसीचें पद एखाद्या हिंदी गृहस्थास मिळेल, अशी वाटत असलेली आशा फोल ठरली आहे.

### कोळशाच्या अभावीं कारखाने बंद

कोळसा व रसायनें ह्यांच्या पुरेशा पुरवठ्याचे अभावीं गेल्या बारा महिन्यांत सुमारें २० हिंदी काच कारखाने बंद ठेवावे लागले.

### कृत्रिम रबराचें उत्पादन

कृत्रिम रबराच्या व्यापारी प्रमाणावरील उत्पादनास ग्रेट ब्रिटन-मध्यें अद्याप प्रारंभ झालेला नाहीं. एका ब्रिटिश कंपनीस १९४३ साठीं परवाना दिला, परंतु तिच्या कारखान्याची उभारणी अद्याप पुरी झालेली नाहीं.

### गुळाचा नियंत्रित भाव

महाराष्ट्र व कर्नाटक प्रांत तयार होणाऱ्या गुळाची किंमत मर्यादेंत रहावी ह्यासाठी मुंबई सरकारनें पहिल्या प्रतीच्या गुळाची घाऊक किंमत १४ रुपये मण ( ८२$\frac{2}{7}$ पौंड ) म्हणजे ४२ रुपये पल्ला अशी नियंत्रित केली आहे.

### रेल्वे रस्ता तयार करण्यासाठी युद्धकैदी

सयाम व ब्रह्मदेश ह्यांस जोडणारा रेल्वे रस्ता व मोटार रस्ता तयार करण्याचे कामीं जपाननें सुमारें ६०,००० श्वेतवर्णीय युद्धकैद्यांचा उपयोग केला. त्यांतील बहुसंख्य युद्धकैदी ब्रिटिश व ऑस्ट्रेलियन होते. आशियांतील लोकहि कामावर लावले होते. त्यांचेमधील मृत्यूचें प्रमाण श्वेतवर्णीयांतील प्रमाणापेक्षा अधिक पडलें असलें पाहिजे.

### रेल्वेवरील ताण आणखी एक वर्ष तरी चालू राहणार

येत्या कांहीं महिन्यांत हिंदी रेल्वे वहातुकीवर कमालीचा ताण पडेल, असें रेल्वे वहातुक मंत्री सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं एका मुलाखतींत नुकतेंच सांगितलें. पुरेशा वॅगन्स हातीं येण्यापूर्वी १९४५ साल संपत येईल व नंतर मात्र परिस्थिति सुधारण्याची आशा आहे.


कै. न्या. मा. गो. रानडे यांच्या स्मरणार्थ स्थापन झालेली

# मागोरा केमिकल कंपनी लि., पुणें

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) श्री. प. व्ही. रानडे (चेअरमन), (१) मेसर्स व्ही. आर. रानडे ॲण्ड सन्स लि. पैकीं सी. पार्टनर (२) डायरेक्टर, नवयुग चित्रपट लि. (३) चेअरमन, क्लब ऑफ महाराष्ट्र लि., ... ... पुणें

(२) सरदार खंडेराव रामराव ऊर्फ बापुसाहेब विंचूरकर, बी. ए., एलएल. बी. (व्हा. चेअरमन), (१) फर्स्ट क्लास सरदार, (२) एक्स आफिशिओ डायरेक्टर, कृष्णा शुगर मिल्स लि. (३) पार्टनर, विंचुरकर ॲण्ड को., कृष्णा शुगर मिल्सचे मॅनेजिंग एजंट्स ... पुणें

(३) संगीत-कला-निधि मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर, सुप्रसिद्ध गायक व संगीत दिग्दर्शक पुणें

(४) श्री. वामन काशिनाथ जोगळेकर, मेसर्स लक्ष्मण भार्गव जोगळेकर, प्रसिद्ध व्यापारी यांच्यापैकीं पुणें

(५) श्री. एन. जी. रानडे, प्रसिद्ध कॉंट्रॅक्टर व व्यापारी, पुणें

(६) सरदार गोविंदराव बळवंतराव ऊर्फ दाजीसाहेब पटवर्धन, (१) फर्स्ट क्लास सरदार (२) डायरेक्टर, ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि., (गूळ कंपनी) (३) डायरेक्टर, न्यू प्रॉव्हि. इन्शु. कं. लि. (४) डायरेक्टर, पेपर ॲण्ड पल्प कन्व्हर्शन्स लि., (५) डायरेक्टर, चित्तपावन उद्योग-निधि-मंडळ ... ... पुणें

(७) प्रो. बी. डी. सट्टीगिरी, एम्. ए., एलएल. बी. (१) प्रोफेसर ऑफ इंग्लिश, एस. पी. कॉलेज (२) डायरेक्टर, नवयुग चित्रपट लि. (३) चेअरमन, महाराष्ट्र टेक्स्टाइल्स लि. भोर ... ... पुणें

(८) श्री. हरि केशव जोशी, बी. एससी. (१) डायरेक्टर, हंस पिक्चर्स लि. मॅनेजिंग डायरेक्टर्स टू नवयुग चित्रपट लि. ... ... पुणें

(९) डॉ. एन. एन. गोडबोले, एम्. ए., बी. एससी., पीएच. डी. (बर्लिन), बनारस हिंदु युनिव्हर्सिटी (एक्स-ऑफिशिओ) ... ... बनारस

(१०) श्री. गोविंद महादेव गोळे, बी. एससी., मॅनेजर व चीफ केमिस्ट, चांगदेव शुगर मिल्स लि. पुणतांबें (एक्स-ऑफिशिओ) ... ... पुणतांबें

(११) श्री. महादेव वासुदेव गोळे, (१) डायरेक्टर, न्यू प्रॉव्हि. इन्शु. कं. लि. (एक्स-ऑफिशिओ) पुणें

(१२) श्री. राजाराम यशवंत रानडे, बी. ए., सोल पार्टनर मेसर्स आर. वाय. रानडे ॲण्ड को. मॅने. एजंट्स टू मागोरा केमिकल कं. लि. (एक्स-ऑफिशिओ) पुणें

**दी मागोरा केमिकल कं. लि.**—तिच्या अनेक शोधामुळें व मालामुळें जनतेच्या परिचयाची झालेलीच आहे. कराची, मद्रास, कलकत्ता इत्यादि दूरच्या ठिकाणीं कंपनीचा माल जाऊं लागला आहे. रा. सा. नवलकर, एम्. ए. सुप्र. ऑफ एक्साईज पूना डिव्हिजन यांच्या हस्तें ४ महिन्यांपूर्वीं बॉन्डेड लॅबोरेटरीचें उद्घाटन होऊन अखिल महाराष्ट्रांत टिंक्चर्स तयार करण्याचा मान 'मागोरा' ला मिळाला आहे. हल्लीं कंपनीचीं जवळजवळ ६० तऱ्हेचीं टिंक्चर्स व इतर औषधें अनेक डॉक्टर्स वापरीत असून त्यांच्या गुणाबद्दल त्यांनीं प्रशंसा केली आहे. त्याचप्रमाणें कीटकनाशक इत्यादि २० तऱ्हेचे जिन्नस बाजारांत चालू आहेतच. आतां डॉक्टरसंना लागणारीं सर्व तऱ्हेचीं **इंजेक्शनस्, टॅब्लेटस्, एक्स्ट्रॅक्टस** तयार करण्याची योजना आंखली असून त्यासाठीं जास्त पैशाची जरूर आहे. मध्यंतरीं आम्हीं ठेवी घेण्याचें बंद केलें होतें, परंतु वरील गोष्टींसाठीं पुनः जास्त ठेवी घेण्याचें ठरविलें आहे. रु. ५०० पेक्षां कमी रकमेची ठेव स्वीकारली जाणार नाहीं. जास्त माहितीसाठीं लिहा.

### मुदत व दर

१ वर्ष द. द. शें. ५ टक्के   २ वर्षें द. द. शें. ५॥ टक्के   ३ वर्षें द. द. शें. ६ टक्के

आर. वाय. रानडे ॲण्ड को.

हिराबाग, पुणें २.   मॅनेजिंग एजंट्स.

## बिहार प्रांताची सहकारी परिषद

### श्री. वैकुंठराय मेथा यांचें अध्यक्षीय भाषण

गेल्या आठवड्यांत पाटणा येथें बिहारची प्रांतिक सहकारी परिषद भरली होती, तिचें अध्यक्षस्थान श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं मंडित केलें होतें. त्यांचें अध्यक्षीय भाषण अपेक्षेप्रमाणें विचार-परिप्लुत आणि स्फूर्तिदायक झालें. चालू युद्धामुळें सर्व देशांत भावी आर्थिक व सामाजिक घटनेबाबत विशिष्ट ध्येयें व रचना ह्यांचेसंबंधांत नव्या कल्पना उत्पन्न झाल्या असून त्यांस अनुसरून राष्ट्रीय योजनात्मक धोरणें आखण्यांत येत आहेत. त्यांचे दृष्टीनें हिंदुस्थानांतील सहकारी संघटनेचा विचार करण्याची आवश्यकता प्रतिपादून श्री. वैकुंठराय ह्यांनीं बिहार प्रांतांतील सहकारी संस्थांच्या परिस्थितीची छाननी केली. चौदा वर्षीमागें आर्थिक मंदीची लाट उसळली त्यावेळीं ह्या देशांतील प्रांतिक सरकारांनीं शेतकऱ्यांस सहाय देण्यांत दिरंगाई केली. अलीकडे शेतीच्या मालाच्या किंमती चढल्यामुळें सहकारी पतपेढ्यांच्या सभासदांचीं थकलेलीं कर्जें फेडलीं जाण्यास मदत झाली आहे ह्यांत शंका नाहीं. इतर प्रांतांशीं तुलना करतां बिहारमध्यें जुन्या कर्जाची फेड आणि नव्या कर्जाचें प्रमाण ह्यांमध्यें कमी सुधारणा झालेली आहे. अगदी अलीकडे कदाचित् प्रगति झाली असण्याचा संभव आहे. तथापि सहकारी संस्थांशीं संबंध असलेल्या शेतकऱ्यांचें प्रमाण त्या प्रांतांत अत्यंत अल्प आहे. ह्या प्रवृत्तीस अनुलक्षून बिहार सरकारनें प्रांतिक बँक व सेंट्रल बँका ह्यांचेमार्फत शेतकऱ्यांस, ते सहकारी पेढ्यांचे सभासद असोत वां नसोत, कर्जें मिळण्याची योजना अंमलांत आणली आहे तिचा श्री. वैकुंठराय ह्यांनीं निर्देश केला. सहकारी वृत्तीचा ज्या पैशाच्या व्यवहारांत परिपोष होत नाहीं ती व्यवस्था समाधानकारक नाहीं असें मत देऊन उसाच्या धंद्याबाबत सरकारनें मालाच्या किंमती व विक्री इत्यादींचे बाब-तींत जी खास नियंत्रणात्मक योजना अंमलांत आणली आहे ती बिहारमध्यें सार्वत्रिक होऊं शकणार नाहीं असें ते म्हणाले. तथापि, सहकारी कर्जें, सहकारी मालविक्री व सहकारी नियमन ह्यांची सांगड घातली जाण्याच्या आवश्यकतेस त्यांनीं पाठिंबा दिला. खेडेगावांमध्यें शेतकऱ्यांस जोडधंदे उपलब्ध करून दिल्यावांचून ग्रामीण जनतेची रहाणी सुधारणार नाहीं आणि युद्धोत्तर कालीन पुनर्रचनेच्या योजनेंत ह्या प्रश्नास महत्त्वाचें स्थान मिळणें अव-श्याचें आहे असें त्यांनीं सांगितलें. सूत कातणें व कापड विणणें ह्या धंद्यांस सहकारी संघटनेच्या कक्षेंत आणतां येईल आणि ह्याच प्रकारचें संघटन शेती व तिच्याशीं संबंध असलेल्या सर्व व्यवहा-रांत करणें इष्ट आहे ह्या मुद्यावर त्यांनीं विशेष जोर दिला. मालाची विक्री व वाटणी ह्यांचे बाबतींत सध्या सहकारी संस्था बाढतें कार्य करीत आहेत, तें टिकाऊ आणि विस्तृत होण्यासाठीं प्रयत्न करणें आवश्यक आहे असें त्यांनीं सांगितलें.

जॉइंट स्टॉक बँका अलीकडे लहानमोठ्या शहरांत आपल्या शाखांचीं जाळीं पसरीत आहेत, त्यांच्या सहकारी मध्यवर्ती व शहरी बँकांवर होणाऱ्या परिणामांची चर्चा ह्यापुढें श्री. वैकुंठराय ह्यांनीं केली. जुन्या सराफी पेढ्यांची जागा ह्या बँका घेत अस-ल्यानें स्थानिक गरजांसाठी स्थानिक पैसा स्थानिक लोकांनीं उप-योगांत आणण्याचें कार्य सहकारी बँकांनीं स्वतःच्या अंगावर घेणें आवश्यक आहे असें त्यांनीं प्रतिपादलें. युद्धोत्तर कालीन पुनर्घटनेमध्यें सहकारी बँकांच्या ह्या कार्याचें विशेष महत्त्व आहे ही गोष्ट त्यांनीं निदर्शनास आणली. शेवटीं, समाजसेवे-विषयीं आस्था बाळगणाऱ्या निःस्वार्थी कार्यकर्त्यांची संख्या सह-कारी संघटनेंत वाढण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली आणि सहकारी चळवळींत सरकारी नियंत्रण येतें ह्या कारणास्तव तिच्या-पासून दूर रहाणाऱ्या कार्यकर्त्यांनीं हें अलिप्तपणाचें धोरण बद-लणें कां आवश्यक आहे ह्याचा खुलासा केला. सहकारी तत्त्वा-वर आर्थिक संवर्धनें होण्याची खबरदारी लोकांनीं एव्हांपासून घेतली नाहीं तर युद्धोत्तरकालीन आर्थिक धोरणाची गाडी अनिष्ट रुळांवर जाण्याची भीति आहे असें त्यांनीं बजावलें. भांडवल-शाही आणि राजकीय नोकरशाही ह्या दोन्ही अनुभवानें अयशस्वी ठरल्या असल्यानें सहकारी तत्त्वाच्या लोकशाहीचा पुरस्कार आपण केला पाहिजे असा संदेश श्री. वैकुंठराय ह्यांनीं आपल्या भाषणाच्या अखेरीस दिला.

---

## सहकारी स्टोअर्सना अल्प व्याजानें कर्ज

### मद्रास सहकारी परिषदेचा ठराव

मद्रास प्रांतांतील मध्यवर्ती सहकारी बँकांची परिषद मद्रास येथें नुकतीच भरली होती. त्या परिषदेंत सहकारी स्टोअर्सना मध्यवर्ती बँकांनीं दोन प्रकारें साहाय्य करावें असें ठरलें:—

(१) लोन सोसायट्या व स्टोअर्स ह्यांना बँकांच्या व्यवस्था-पक बोर्डावर प्रतिनिधित्व देण्यांत यावें, व (२) स्टोअर्सना कर्जें व कॅश क्रेडिट अल्प व्याजानें यावीत. ह्या ठरावाप्रमाणें मध्यवर्ती बँका मध्यवर्ती सहकारी स्टोअर्सना ४% व्याजानें कर्जें देतील. घाउक व प्राथमिक स्टोअर्सनाहि त्यामुळें मध्यवर्ती स्टोअर्सकडून त्यामानानें माफक दरानें कर्जें मिळूं शकतील. स्टोअर्स सोसाय-ट्यांना घावयाच्या कर्जाची मुदत पांच वर्षें करण्यांत यावी व त्यासाठी कायदा बदलण्याची विनंति मद्रास सरकारास करण्यांत यावी, असेंहि परिषदेंत ठरलें. मद्रास प्रांतानें ह्या-संबंधांत घालून दिलेलें उदाहरण अनुकरणीय आहे.

---

### इं. सें. शुगरकेन कमिटी

हिंदुस्थान सरकारनें इंडियन सेंट्रल शुगरकेन कमिटी नेमली आहे. उसाबाबत संशोधन करविणें व साखरेच्या धंद्याबाबत सुधारणा सुचविणें हें ह्या कमिटीचें काम राहील. “ सोसायटी ” म्हणून कमिटी रजिस्टर केली जाईल. इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी प्रस्तुत कमिटीच्या नियंत्रणासाठीं जाईल. साखरेच्या एक्साइज फंडांतून कमिटीचा सर्व खर्च भागविण्यांत येईल. साखरेच्या उत्पादनाप्रमाणें कमिटीचें उत्पन्न वाढेल आणि कोणत्याहि वर्षी सर्व भागू शकला नाहीं तर सरकार कमिटीला बिन-व्याजी कर्ज देईल. ज्यावेळीं कमिटीचें सर्वापेक्षा अधिक उत्पन्न होईल, त्यावेळीं हें कर्ज फेडण्याकडे त्या वाढाव्याचा प्रथम विनियोग केला जाईल. कमिटी विषयवार उपसमित्या नेमून आपलें काम सभासदांत वाटून देईल.

---

## मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचा वार्षिक अहवाल

( ३० जून, १९४४ अखेरचा वार्षिक अहवाल इन्स्टिट्यूटच्या वार्षिक सभेत ता. १९ डिसेंबर रोजी मंजूर करण्यांत आला. त्याचा गोषवारा खालीं दिला आहे. )

३० जून, १९४३ अखेर इन्स्टिट्यूटचे ११९ सभासद होते, त्यापैकीं ८० व्यक्ती होत्या. ३० जून, १९४४ अखेर १४५ सोसायट्या व १२३ व्यक्ती मिळून २६८ सभासद पटावर आले. आजीव सभासदांची वर्गणी ५०० रुपयांची उतरवून १२५ रुपये करण्यांत आली व ९ आजीव सभासद अहवालाचे वर्षी नोंदण्यांत आले. ११ जुलै १९४३ रोजीं इन्स्टिट्यूटचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत आला व त्यानिमित्त मुंबईप्रमाणें प्रांतांतील इतर ठिकाणींहि सभा भरविण्यांत आल्या. इन्स्टिट्यूटचें शैक्षणिक कार्यक्षेत्र निश्चित करणारा सरकारी ठराव प्रसिद्ध झाल्याबरोबर एज्युकेशन सुपरवायझर नेमण्याचें काम इन्स्टिट्यूटनें हातीं घेतलें. एज्युकेशन कमिटीमार्फत धारवाड, विजापूर, बेळगांव, पूर्व खानदेश, नाशिक, खेडा व रत्नागिरी ह्या जिल्ह्यांत व प्रत्यक्ष मुंबई शहरांत झालेल्या शैक्षणिक कार्याचें, भरविण्यांत आलेल्या वर्गांचें व परिषदांचें वर्णन व केलेल्या प्रचाराची माहिती ही रिपोर्टांत देण्यांत आली आहे. जेथें एज्युकेशन सुपरवायझर्स नेमलेले नव्हते, अशा फक्त दोन जिल्ह्यांत ऑनररी कार्यकर्ते कांहीं कार्य करूं शकले. एक्झिक्युटिव्ह कमिटीनें शिक्षण समिति, प्रकाशन समिति व संशोधन समिति अशा तीन सब-कमिट्या नेमल्या. शिक्षण समितीनें सहकारी शाळांची योजना तयार केली, तिला अनुसरून २४ जुलै रोजीं अहमदाबाद, पुणें व धारवाड येथें शाळा सुरू करण्यांत आल्या. प्रकाशन समितीनें डॉ. भगतकृत "शेतीच्या मालाची विक्री," श्री. एन्. डी. वैद्यकृत "सहकारी हिशेब" व श्री. एस्. एम्. गजेंद्रगडकरकृत "सहकारी कायदा" हीं तीन पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें योजिलें. देवधर मेमोरिअल ट्रस्ट ह्या मालेंतील पहिलें पुस्तक म्हणून भडोच सें. को. बँकेचे मॅनेजर श्री. नगरशेठ ह्यांस अन्नवाटणींत सहकारी संघटनेनें केलेलें कार्य ह्या विषयावर पुस्तक लिहिण्यास विनंति करण्यांत आली. वर्ष संपल्यानंतर हें पुस्तक इन्स्टिट्यूटचे हातीं आलें. ( आतां तें प्रसिद्ध झालें आहे. )

शेतकी पतपेढ्यांच्या सभासदांवर युद्धजन्य परिस्थितीचा काय परिणाम झाला आहे ह्याची पहाणी करण्याचें को. बँक्स असोसिएशनच्या सूचनेवरून संशोधन समितीनें ठरविलें. सरकारनें ह्यासाठीं १,००० रुपयांची ग्रँट मंजूर केली. जेथें ॲग्रि. डेटर्स रिलीफ ॲक्ट लागू आहे आणि लागू नाहीं अशा दोन्हीं क्षेत्रांचा पहाणींत समावेश व्हावा, असें सरकारनें सुचविलें. समितीनें प्रश्नपत्रिका तयार केली व तिघां जणांची माहिती मिळविण्याचें कामीं नेमणूक केली. प्रत्यक्ष कामास प्रारंभ ऑगस्ट, १९४४ मध्यें झाला.

एक्झिक्यूटिव्ह कमिटीनें सरकारशीं विचारविनिमय करून, युद्धोत्तर काळांतील सहकारी चळवळीच्या वाढीसंबंधीं विचार करून सरकारला सूचना करण्यासाठीं इन्स्टिट्यूटचे चेअरमन, प्रांतिक बँकेचे चेअरमन व रजिस्ट्रार यांची एक कमिटी नेमली. प्रो. डब्ल्यू. आर. नातू ह्यांनीं कमिटीचे सेक्रेटरी म्हणून काम केलें. कमिटीचा प्रारंभीचा अहवाल ता. १५-३-४४ रोजीं सरकारकडे धाडण्यांत आला व पक्का अहवाल ता. ३ ऑगस्ट, १९४४ रोजीं रवाना झाला.

बी, खतें, वगैरेंचा सवलतीचे दरानें पुरवठा करण्याचें सरकारनें ठरविलें, त्याचा फायदा घेण्यासाठीं सहकारी संस्थांनीं त्या जिनसांची मागणी एकत्र करून ती ज्या त्या भागाच्या डे. डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरकडे पाठवावी, असें एक पत्रक इन्स्टिट्यूटच्या सेक्रेटरींनीं पाठविलें. अन्नपुरवठ्याचे कामीं सरकारनें सहकारी संस्थांचा शक्य तितका उपयोग करून घ्यावा, अशी विनंति चेअरमननीं प्रांतांतील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून केली. बॉंबे को. क्वार्टर्लीत ह्या विषयावर लेख प्रसिद्ध झाले. शेतकी पतपेढ्यांच्या सभासदांचे आर्थिक परिस्थितींत आतां सुधारणा घडून आलेली आहे, तिचा उपयोग सहकारी चळवळीचा पाया भक्कम होण्याकडे केला जावा ह्या दृष्टीनें त्यांनीं साठविलेला पैसा पतपेढ्यांकडे ठेव म्हणून ठेवला जावा, अशी सूचना चेअरमननीं एका पत्रकाचेद्वारां केली.

इन्स्टिट्यूटच्या मुख्य कचेरीनें अहवालाचे वर्षांत दोन ट्रेनिंग क्लासेस यशस्वी रीतीनें चालविले, एक लँड मॉर्गेज बँकांचे नोकरवर्गासाठी व एक परचेस ॲंड सेल सोसायट्या, मध्यवर्ती बँका वगैरेंसाठीं. त्याचा अनुक्रमें १६ व १२ लोकांनीं फायदा घेतला.

सटाणा को. सीड सप्लाय ॲंड सेल सोसायटी लि., सटाणा, ह्या संस्थेच्या इमारत खर्चास मदत म्हणून सर ललुभाई सामळदास मेमोरिअल फंडाच्या मॅनेजिंग कमिटीनें ३,००० रुपये मंजूर केले. इमारतीचें नांव "सर ललुभाई सामळदास मेमोरिअल बिल्डिंग" असें ठेवण्यांत येईल व त्यांतील एक हॉल सटाण्यास येणाऱ्या शेतकऱ्यांस विश्रांतीसाठीं राखून ठेवण्यांत येईल, ह्या अटींवर हे पैसे दिले जातील.

अखिल भारतीय सहकारी दिन ६ नोव्हेंबर रोजीं साजरा झाला. २६५ सोसायट्यांनीं दिलेल्या ३६,४७७ रुपयांच्या देणग्यांस कायद्याच्या ४२ व्या कलमाप्रमाणें मंजुरी दिली गेली.

---

### खाकुर्डी कोऑपरेटिव्ह के. सोसायटी रौप्य महोत्सव

खाकुर्डी को. के. सोसायटी, खाकुर्डी, ता. मालेगांव, ही संस्था ता. १३-७-१९१८ रोजीं स्थापन झाली. तिचा रौप्य महोत्सव ता. २९-१०-१९४४ रोजीं नाशिक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे पुढारी आमदार भाऊसाहेब हिरे, बी. ए., एलएल. बी., एम्. एल. ए. यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. सदर सोसायटी सध्यां 'अ' वर्गांत असून ती स्थापन झाले तारखेपासून आजपर्यंत मालेगांव तालुक्यांतील सहकारी चळवळीचे पितामह मे. लोटन नाथू पाटील हेच तिचे चेअरमन म्हणून काम करीत आले आहेत.

सभेचे वेळीं मे. चिंधू हिलाजी पाटील, हेडमास्तर खाकुर्डी, मे. एस. जे. बुच बँक इनस्पेक्टर मालेगांव, मे. एम. जी. निकम सुपरवायझर मालेगांव ख़ु. यु., मे. बुवा मास्तर ए. सुपरवायझर साहेब मालेगांव भाग शिक्षण प्रसारक मंडळ मालेगांव यांचीं भाषणें झालीं. मे. निकम सुपरवायझर यांनीं सोसायटीचा गेल्या पंचवीस वर्षांचा त्रोटक इतिहास वाचून दाखविला. सोयायटीचे ग्रुप सेक्रेटरी श्री. गं. ग. कुलकर्णी यांनीं आलेले संदेश वाचून दाखविले.

अध्यक्षांचे हस्तें सोसायटींतील कार्यकर्त्यांना सुमारें २०५ रुपये किंमतीचीं चांदीचीं भांडीं बक्षिस देण्यांत आलीं. अध्यक्षांचें शेतकऱ्यांनीं बचत कशी करावी. सोसायटीपासून फायदे, याबद्दल उद्बोधक भाषण झालें. हारतुरे-पानसुपारी होऊन सायंकाळीं कुस्त्या व रात्रौ जेवणानंतर करमणुकीचे कार्यक्रम झाले.

## रॉकडेल पायोनिअर्सचा शतसांवत्सरिक उत्सव

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या आदेशाप्रमाणें इंग्लंडांत सहकारी चळवळीची संस्थापना करणाऱ्या रॉकडेल येथील रॉकडेल पायोनिअर्स सोसायटीचा शतसांवत्सरिक उत्सव मुंबई प्रांतांत ठिकठिकाणीं साजरा झाला. त्या प्रसंगीं, इन्स्टिट्यूटनें पाठविलेला खालील ठराव संमत होऊन त्यावर समयोचित भाषणें झालीं.

**अभिनंदनाचा ठराव**

" रॉकडेल पायोनिअर्स सोसायटीच्या शतसांवत्सरिक महोत्सवाचे प्रसंगीं शहरांतील सहकारी बांधवांची ही जाहीर सभा इंग्लंडांतील सहकारी जनतेचें अभिनंदन करून इतर देशांतील सहकारी बांधवांशीं बंधुत्व भाव व्यक्त करीत आहे.

रॉकडेल प्रणेत्यांचा सेवाभाव, चिकाटी, दूरदृष्टी, संघटनाचातुर्य ह्या गुणांचा आम्ही हिंदी सहकारी बांधव गौरव करितों व मजुरांच्या उन्नतीसाठी शंभर वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें ह्या गुणांची जेवढी जरूरी होती तेवढीच आज हिंदुस्थानांत शेतीच्या व शेतकऱ्यांच्या पुनर्घटनेसाठी ह्या गुणांची जरूरी आहे असें आमचें ठाम मत आहे.

रॉकडेल प्रणेत्यांच्या कर्तृत्वापासून व त्यांच्या कार्यांच्या मूलभूत व सर्वमान्य तत्त्वापासून येथील कार्यकर्त्यांस स्फूर्ति मिळो व सहकार्याच्या द्वितीय शतकांत ह्या देशांत सहकाराच्या कंझूमर्स व इतर सर्व शाखांचा राष्ट्रव्यापी विस्तार होवो. "

**मुंबई येथील सभेंतील सर जनार्दन मदन ह्यांचें भाषण**

" फ्रेंच राज्यक्रांतीमुळें राजकीय अधिकाराबद्दल युरोपियन राष्ट्रांत जागरूकता निर्माण झाली, तरी औद्योगिक क्रांतीमुळें निर्माण झालेल्या मजूर वर्गाचे हाल थांबविण्यास ती समर्थ नव्हती. कामकरी लोकांना स्वावलंबनाचा मार्ग पत्करून स्वतःची उन्नति करून घेण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. रॉकडेल स्टोअर हा अशा प्रकारचा पहिलाच प्रयत्न नसला, तरी सर्व अडचणी दूर सारून यशस्वी होणारा अजरामर स्टोअर तोच ठरला. त्यांतूनच पुढें सहकारी स्टोअर्सचें जाळें पसरलें. १८६४ सालीं स्थापन झालेल्या को-ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटीनें उत्पादनासहि प्रारंभ केला. हिंदुस्थान व सिलोन ह्या देशांत त्या सोसायटीच्या मालकीचे मळे आहेत. इंग्लंडमध्यें खपणाऱ्या प्रत्येक सात पेल्यापैकी एक पेला चहा ह्या मळ्यांतील पत्तीचा असतो ! हिंदुस्थानांत त्रिप्लिकेन अर्बन सोसायटी १९०६ सालीं स्थापन झाली. युद्धानें स्टोअर्सच्या चळवळीस चालना दिली आहे. रेशनिंग बंद झालें, तरी हे स्टोअर्स चालू रहातील अशी आशा आहे. "

**पुणें येथील सभा**

प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटच्या आदेशास अनुसरून पुणें येथें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत गेल्या गुरुवारीं रॉकडेल पायोनिअर्सच्या शतसंवत्सरीच्या निमित्तानें प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली होती. श्री. द. दि. चितळे ह्यांनीं प्रास्ताविक व स्वागतपर भाषण केलें. अध्यक्षांनीं सभेचा उद्देश थोडक्यांत समजावून सांगितला आणि रॉकडेल पायोनिअर्सचें कार्य व त्यापासून घ्यावयाचा बोध ह्याचें विवेचन श्री. दा. बा. पोतदार व असि. रजिस्ट्रार श्री. एन. व्ही. नायक ह्यांनीं केलें. पायोनिअर्ससंबंधानें आदर व्यक्त करणारा ठराव श्री. य. धों. ओगले ह्यांनीं पुढें मांडला आणि त्यास अनुमोदन व दुजोरा श्री. दा. ग. बापट व श्री. शंकरराव गोखले ह्यांनीं दिल्यावर प्रो. काळे यांनीं समारोपाचें भाषण केलें. श्री. चितळे ह्यांनीं आभार प्रदर्शन केल्यावर सभेचें काम समाप्त झालें.


**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्यांचे व्यापारी
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

**पूना गेस्ट हाऊस**
संस्थापक :
के. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७९

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेटॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
**पेन्टर बेडेकर, ए. जी.,**
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
**मैलाचा — दगड**
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**
आर. जी. साठे — सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

### शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न कसा सुटेल !

" बहुजन समाजाच्या आर्थिक जीवनाच्या दृष्टीनें सहकारी चळवळ यशस्वी व्हावयाची असेल तर बहुजन समाजाची उत्पादनक्षमता वाढविली पाहिजे. शेतकऱ्यानें जास्त पिकविलें पाहिजे व त्यानें जेवढें पिकविलें त्याला जास्तींत जास्त किंमत आली पाहिजे. उत्पादन वाढविण्यासाठीं शेतीच्या तुकड्यांचे सहकारी पायावर एकत्रीकरण केलें पाहिजे. वर्षांतून तीन महिने बिनपगारी मोकळा असणाऱ्या शेतकऱ्याला जोड धंद्यांची सोय करून दिली पाहिजे. म्हणजे आजचा त्याचा आंतबट्ट्याचा व्यवहार बंद होईल व त्याच्या खिशांत कांहीं तरी शिल्लक पडेल. त्यानें केलेल्या उत्पादनाला योग्य किंमत येण्यासाठी मार्केटिंग देखील सहकारी तत्त्वावर सुरू केलें पाहिजे. आर्थिक सहाय्य, उद्योगधंद्यांची जोड आणि विक्रीची व्यवस्था या त्रिमूर्तींची उत्कृष्ट सांगड घातल्याविना शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न सुटणार नाहीं. " विना सहकार नहि उद्धार " या बोलीचा अर्थ हाच आहे. "— दि. ब. काजी ह्यांचें कराड अर्बन को. बँकेंत भाषण.

---

### लासलगांव मर्चंटस को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( स्थापना ता. १७–११–१९४४ )

लासलगांव येथील व्यापारी लोकांच्या सोयीसाठी व्यापारी मंडळींनीं स्थापन केलेल्या वरील बँकेची पहिली साधारण सभा ता. ८ डिसेंबर १९४४ रोजीं शुक्रवारीं रात्रीं ९ वाजतां लासलगांव येथील श्री. लक्ष्मीनारायण मंदिरांत, श्री. एम्. डी. चावडा, बी. ए., सीनियर इन्स्पेक्टर बी. पी. सी. बँक लि. नाशिक विभाग यांचे अध्यक्षतेखालीं होऊन, खालीलप्रमाणें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांची निवड करण्यांत आली.

( १ ) मे. रामकिसन मोतीलाल डागा ( चेअरमन )
( २ ) मे. श्रीराम शंकरलाल पलोड, ( व्हा. चेअरमन )
( ३ ) मे. रावजी दादा अप्पा, डायरेक्टर
( ४ ) मे. खुशालचंद जसराज बरमेचा, डायरेक्टर
( ५ ) अनराज भुरमल संचेती, डायरेक्टर

तसेंच राधाकिसन सदर बँकेच्या बोर्ड ऑफ कंट्रोल कमिटीवर मे. राधाकिसन मयाराम डागा ( चेअरमन ) व मे. भीकचंद दलीचंद सांड यांची निवड करण्यांत आली.

---

### इचलकरंजी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिं., इचलकरंजी

( वार्षिक सभा ३१–१२–४४. )

ही बँक कै. " श्रीमंत नारायणराव बाबासाहेब अधिपती " इचलकरंजी यांचे आश्रयाखाली सन १९३० सालीं स्थापन झाली. बँकेचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. बँकेचें वसूल शेअर भांडवल रु. ३४,९७५ आहे व फंडाची रक्कम रु. ४०,६५३ आहे. ठेवी निरनिराळे खात्यांवर मिळून ५,१०,७८६ रु. इतक्या आहेत. बँकेस चालू वर्षी रु. ५,११५ इतका नफा झाला आहे. भागिदारांना ६ टक्के डिव्हिडंड देणेबद्दल डायरेक्टरांची शिफारस आहे. नफ्यापैकीं बराच भाग रिझर्व्ह वगैरे फंडांत घालणेची बँकेनें प्रथा ठेविली आहे, ती अभिनंदनीय गोष्ट आहे. चालू वर्षी बँकेनें आजरें ( जि. बेळगांव ) येथें आपली शाखा उघडली आहे. इचलकरंजी येथील धान्य पर्चेसिंग एजन्सी कोल्हापूर दरबारनें या बँकेस दिली होती. तें काम बँकेनें उत्तम तऱ्हेनें केलें आहे. स्थापनेपासून गेलीं चौदा वर्षें बँक " अ " वर्गांत आहे, यावरून बँकेचे आर्थिक स्थैर्याबद्दल कोणाचीहि खात्री पटेल.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता ' फार्मर बँक '

अधिकृत भांडवल :: रु. १५,००,०००
काढलेलें भांडवल :: रु. १३,२५,०००
भरलेलें भांडवल :: रु. १३,११,५००

खेळतें भांडवल १९४४ जून अखेर ४ कोटी ७३ लक्ष

………शाखा व उपशाखा………

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | २३ नाशिक ( जि. नाशिक ) |
| २ नीरा „ | २४ लासलगांव „ |
| ३ सातारा ( जि. सातारा ) | २५ मालेगांव „ |
| ४ कऱ्हाड „ | २६ नांदगांव „ |
| ५ किर्लोस्करवाडी „ | २७ घोटी „ |
| ६ कोरेगांव „ | २८ सटाणा „ |
| ७ इस्लामपूर „ | २९ येवलें „ |
| ८ शिराळें „ | ३० धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ तासगांव „ | ३१ दोंडाईचें „ |
| १० वांई „ | ३२ नंदुरबार „ |
| ११ भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ साक्री „ |
| १२ कल्याण „ | ३४ शहादें „ |
| १३ पालघर „ | ३५ शिरपूर „ |
| १४ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिंदखेडें „ |
| १५ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | ३७ तळोदें „ |
| १६ बेलापूर रोड „ | ३८ दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १७ कोपरगांव „ | ३९ गोध्रा „ |
| १८ पाथर्डी „ | ४० झालोद „ |
| १९ राहुरी „ | ४१ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २० शेवगांव „ | ४२ नडियाद ( जि. खेडा ) |
| २१ वांबोरी „ | ४३ आनंद „ |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद ) | |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## रेशनपुरतें धान्य मिळालें, तरी अन्नप्रश्न सुटत नाहीं

शेतीचें उत्पादन वाढवून धान्यपरिस्थिति सुधारण्याचे सरकारी प्रयत्न हिंदुस्थानांत जोमानें चालू आहेत, परंतु त्यांचा लोकांना भरपूर धान्य मिळण्याच्या व्यावहारिक स्वरूपांत परिणाम झाल्याचें दिसत नाहीं. उदाहरणार्थ, तांदळाची लागवड व उत्पादन हीं वाढलीं आहेत, त्यासंबंधांतील आकडे मध्यवर्ती असेंब्लींत नुकतेच सांगण्यांत आले, त्यावर झालेल्या चर्चेचा रोख "मग अद्याप उपासमार कां होत आहे ?" ह्या सर कावसजी जहांगीर ह्यांच्या एकाच प्रश्नानें व्यक्त करतां येईल. "अधिक धान्य पिकवा" मोहिमेच्या गाजावाजाच्या प्रमाणांत प्रत्यक्ष निष्पत्ति झाली नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश असल्या-कारणानें, शेतीचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न ह्यापेक्षां अधिक यशस्वी होणें आवश्यक आहे. ह्यासंबंधांतील ब्रिटनचे आकडे नुकतेच उपलब्ध झाले आहेत, त्यांवरून त्या देशानें केलेल्या प्रगतीची कल्पना येते व तेथील परिस्थिति कौतुकास्पद व हेवा उत्पन्न करणारी वाटते.

### ब्रिटिश शेतीचें उत्पादन दुप्पट झालें

जर्मनीचे अविरत बाँबहल्ले, जर्मनांची केव्हां स्वारी होईल ह्याची कायम भीति व त्यासाठी संरक्षक उपाययोजना, युरोपांत उतरून जर्मनीचा पाडाव करण्यासाठीं करावयाची लष्करी तयारी, दारूगोळा व इतर युद्धोपयोगी मालाचें अखंड उत्पादन, बंद झालेल्या आयातीमुळें झालेली गैरसोय, युद्धानंतर निर्गत व्यापार पुनः सत्वर चालू व्हावा ह्यासाठीं पूर्व तयारी, इत्यादि अवधानांतूनहि शेतीचें उत्पादन चार वर्षांचे अवधींत दुप्पट करून दाखविण्याचा विक्रम ब्रिटिश जनतेनें केला आहे ! गव्हाची लागवड १९३९ सालीं १७¾ लक्ष एकरांत झाली व गव्हाचें उत्पादन १६½ लक्ष टनांचे वर गेलें नाहीं. १९४४ सालांतील गव्हाची लागवड ३२¾ लक्ष एकरांत झालेली आहे व अपेक्षित उत्पादन ३१½ लक्ष टन एवढें आहे. बार्ली, ओट, राय, इत्यादि धान्यांची लागवड व उत्पादन ह्यांतहि अशाच प्रकारें वाढ झालेली आहे. सर्व प्रकारच्या धान्यांचा एकत्रित विचार केला, तर १९३९ सालीं ५३ लक्ष एकर त्यांच्या लागवडीखालीं होते, त्यांत आतां ७८% वाढ होऊन ९४¾ लक्ष एकरांत धान्य पेरण्यांत आलें आहे. उत्पादनाचा आकडा १९३९ सालीं ४४½ लक्ष टन होता तो आतां ८६½ लक्ष टनांपर्यंत गेला आहे.

### हिंदी उत्पादनांतील अत्यल्प वाढ

हिंदुस्थानांतील सर्व प्रकारच्या धान्यांच्या लागवडीच्या व उत्पादनाच्या आकड्यांची वरील आकड्यांशीं तुलना करणें बोधप्रद होईल. सर्व प्रकारच्या धान्यांच्या लागवडीखालीं युद्धा-पूर्वी १९½ कोटि एकर जमीन असे, गेल्या वर्षी ती २० कोटि, ६३ लक्ष एकर झाली. म्हणजे, लागवडीच्या क्षेत्रांत सुमारें १ कोटि, १३ लक्ष एकरांची भर पडली. हीच वाढ शतमानानें व्यक्त करावयाची म्हटल्यास, लागवड ५·८% वाढली असें म्हणतां येईल. ब्रिटिश धान्याच्या लागवडीची तत्सम वाढ ७८% आहे. उत्पादनाचे आकडे पाहिले, तर धान्यांचें उत्पादन ५ कोटि, ५५ लक्ष टनांवरून ६ कोटि, १० लक्ष टनांवर गेलें आहे. म्हणजे वार्षिक उत्पादनांत ५५ लक्ष टनांची भर पडली आहे. ग्रेटब्रिटनमधील धान्यांचें उत्पादन सुमारें ९४ वाढलें, तर हिंदी धान्यांचें उत्पा-दन १०% पेक्षां ज्यास्त वाढलेलें नाहीं.

### दूध, भाजीपाला, फळें ह्यांकडे दुर्लक्ष

हिंदुस्थानांत अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार करण्यांत येतो, त्यावेळीं फक्त धान्याचीच बाब लक्षांत घेतली जाते. वास्त-विक पाहतां, मुख्य धान्याच्या कांहीं प्रमाणांत दूध, भाज्या, फळें इत्यादि संरक्षक संवर्धक बाबींचाहि समावेश अन्नांत होणें अत्यंत महत्त्वाचें असतें. परंतु, जेथें पोटभर भाकरीचीच वानवा तेथें मुलशुद्धीची चौकशी कोण करणार ! मनुष्यामध्यें रोगप्रति-बंधक शक्ति आणण्यास व त्याची ताकद राखण्यास, त्याच-प्रमाणें शरीराची वाढ करण्यास संरक्षक व संवर्धक अन्नाचा फार उपयोग होतो. गेलीं पन्नास वर्षें, हिंदी कामगार, शेतकरी व मध्यमवर्गीय लोक ह्यांच्या अन्नाच्या कसदारपणांत विघाड होत चालला आहे. त्यांना मुख्यतः धान्यावरच निर्वाह करावा लागतो. सध्याच्या युद्धपरिस्थितींत तर संरक्षक व संवर्धक अन्नांचा तुट-वडा तीव्रतेनें भासूं लागला आहे. हिंदी लोकांना धान्याचें रेशनिंग झालें म्हणजे पुरें, अशी सरकारची चुकीची समजूत होण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांत धान्यापलीकडे अन्नाचा विचारच होऊं शकत नाहीं, ही गोष्ट चिंतनीय आहे.

### ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान

ग्रेट ब्रिटनमध्यें गेल्या पांच वर्षांत बटाट्यांची लागवड दुपटीपेक्षां ज्यास्त झाली आहे व भाजीपाल्याच्या लागवडींतहि ६६% वाढ झालेली आहे, ह्यावरून वरील गोष्टींकडे ब्रिटिश सरकार कसें लक्ष पुरवीत आहे, हें दिसून येईल. ग्रेट ब्रिटनमध्यें लोकांना वाटेल तेवढी गव्हाची रोटी मिळूं शकते, दुधाचा खप युद्धकालांतहि वाढला आहे, युद्धपूर्व भावानें बटाट्यांचा मुबलक पुरवठा होत आहे, वगैरे गोष्टींवरून, बाहेरून येणाऱ्या अन्नावर प्राधान्येंकरून संसार करणाऱ्या ग्रेट ब्रिटनमध्यें शेतीच्या उत्पादनाचे बाबतींत युद्धकालांतहि केवढी क्रांति घडून येऊं शकली व तेथील लोकांचें पोषण व संवर्धन कसें होत आहे, ह्याची कल्पना येईल. हिंदुस्थानसारख्या शेतीप्रधान देशाचें मात्र अजून धान्याच्या खाईचें ग्रहण सुटलेलें नाहीं. दूध, फळें, भाज्या वगैरे जिनसांचा तर विचारच दूर राहिला.

### प्रचाराचें महत्त्व


येथें अशी परिस्थिति का, हें नीट लक्षांत आणून धान्याबरो-बर भाजीपाला वगैरेंचाहि पुरवठा वाढविण्याचा प्रचार जोमानें होणें अगत्याचें आहे. हिंदी लोकांना धान्यापलीकडे दुसरें कांहीं लागतच नाहीं, ही समजूत निराधार आहे. त्यांना फळें व भाजी खाणें परवडतच नाहीं, हीच गोष्ट सत्य आहे. जन-तेचें दारिद्र्यच ह्या सर्वांस कारणीभूत आहे, आणि तें दूर झाल्या-विना व धान्य खरेदी केल्यानंतर दूध व फळें खाण्यास हाताशीं पैसा शिल्लक राहिल्याविना हा प्रश्न समाधानकारक सुटणार नाहीं. असें असलें तरी संरक्षक व संवर्धक अन्नाबाबत प्रचार चालू ठेवून त्यांचें महत्त्व लोकांना पटवून देणें अगत्याचें आहे. त्याचा उप-योग झाल्याशिवाय रहाणार नाहीं. अधिक धान्याबरोबरच दूध, भाज्या, फळें इत्यादींचा स्वस्त व मुबलक पुरवठा सरकारनें घड-वून आणला पाहिजे. महाराष्ट्रांतील कामगारांच्या मानानें अधिक सकस अन्न खावयास मिळणाऱ्या पंजाबी कामगारांची वाढ व त्यांचा उत्साह इंग्रजांच्या तोडीचा असतो. ह्यावरून पुरेसें व चांगलें अन्न खावयास मिळालें तर हिंदी मनुष्याची कार्यक्षमता पुष्कळच प्रभावी होईल हें सिद्ध होतें.

≡ पुणें सदाशिव ( नवी ) पेठेंतील १९ प्लॉटसची ≡


# यशवंत बाग

१२ प्लॉट्स गांवठाणांतील व त्यांना लागून ७ प्लॉट्स टी. पी. स्कीममधील.

यशवंत बागेची मार्गदर्शिका




यशवंत बागेंतील १९ प्लॉटस्चा नकाशा




सूचना—पुणें येथील टिळक रोडवरील साहित्य परिषदेच्या ऑफिसवरून जो रस्ता चिमणबागेकडे जातो त्या रस्त्याच्या पलीकडे ट्रेनिंग कॉलेज फॉर मेनच्या क्रीडांगणास लागून हे प्लॉट्स् आहेत.

— त्वरित भेटावें अगर लिहावें —

दयानिवास, नारायण पेठ,
कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें. }

**म. य. दातार.**


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.